RNI No. MAHBIL /2009/31733

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–अ

वर्ष ४, अंक ९०] मंगळवार, जुलै ३१, २०१८/श्रावण ९, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १५४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

विधि व न्याय विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जुलै २०१८

अधिसूचना

महाराष्ट्र दिवाणी न्यायालये अधिनियम.

क्रमांक सीआरसी. १६१६/प्र.क्र. १७/का.बारा.— महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९ (१८६९ चा १४) याच्या कलम २२अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचनांचा जेथवर जिल्हा न्यायालय, बुलढाणा यांच्याशी दुय्यम असलेल्या दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), शेगाव व दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), नांदुरा यांच्याशी संबंध आहे तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक १ ऑगस्ट २०१८ पासून असे निदेश देत आहे की,—

(क) बुलढाणा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), शेगाव यांच्या सर्वसाधारण अधिकारीतेच्या स्थानिक सीमांमध्ये यापूर्वी समाविष्ट केली होती अशी यासोबत जोडलेल्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेली गावे, त्यातून वगळण्यात येतील आणि बुलढाणा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), नांदुरा यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट करण्यात येतील ;

(ख) बुलढाणा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), शेगाव यांच्याकडे उक्त दिनांकापूर्वी प्रलंबित असलेली, उक्त अनुसूचित नमूद केलेल्या सर्व गावांत उद्‌भवणारी दिवाणी स्वरुपाची सर्व प्रकरणे, बुलढाणा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), नांदुरा यांच्याकडे हस्तांतरित होतील ;

(ग) उक्त अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सर्व गावांत उद्‌भवणारी दिवाणी प्रकरणे बुलढाणा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), नांदुरा यांच्याकडे दाखल होतील आणि ते त्यावर कार्यवाही करतील.

अनुसूची

बुलढाणा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), शेगाव यांच्या अधिकारीतेतून वगळण्यात आलेली आणि बुलढाणा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), नांदुरा यांच्या अधिकारीतेमध्ये समाविष्ट केलेल्या गावांची यादी :—

अ.क्र.	गावाचे नाव
१	भोटा
२	हिंगणा भोटा
३	रोटी
४	हिंगणा दादगाव
५	हिंगणा इसापूर
६	दादगाव
७	अंबोडा
८	इसापूर
९	वसाडी खुर्द

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. श्यां. कलोती,
शासनाचे सह सचिव व विधि सल्लागार.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032
dated the 30th July 2018

NOTIFICATION

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.

No. CRC. 1616/CR. 17/Desk XII.—In exercise of the powers conferred by Section 22A of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869) and of all other powers enabling it in this behalf, and in partial modification of all other earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the Court of Civil Judge (Junior Division), Shegaon and the Court of Civil Judge (Junior Division), Nandura, sub-ordinate to the District Court, Buldhana, the Government of Maharashtra hereby, with effect form 1st August 2018 directs that,—

(*a*) the villages specified in the Schedule appended herewith which were heretofore included within the local limits of the ordinary jurisdiction of the Court of Civil Judge (Junior Division), Shegaon in Buldhana District shall be excluded therefrom and be included within the local limits of the ordinary jurisdiction of the Court of Civil Judge (Junior Division), Nandura in Buldhana District ;

(*b*) all the matters of civil nature arising out of the villages mentioned in the said Schedule pending before the said date in the Court of Civil Judge (Junior Division), Shegaon in Buldhana District shall stand transferred to the court of Civil Judge (Junior Division), Nandura in Buldhana District ; and

(*c*) the civil cases arising out of the villages mentioned in the said Schedule shall be filed in and dealt with by the Court of Civil Judge (Junior Division), Nandura in Buldhana District.

SCHEDULE

List of Villages excluded from the jurisdiction of the Court of Civil Judge (Junior Division), Shegaon in Buldhana District and included in the jurisdiction of the Court of Civil Judge (Junior Division), Nandura in Buldhana District.

Sr. No.	Name of Villages
1	Bhota
2	Higna Bhota
3	Roti
4	Hingana Dadgaon
5	Hingana Esapur
6	Dadgaon
7	Amboda
8	Esapur
9	Vasadi Khurd

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. KALOTI,

Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.